सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १६ | गुरुवार, दि. ९ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## आजपासून १३ ऑक्टोबरपर्यंत मंगळ करणार मंगल!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मंगळ ग्रहाला साहस, पराक्रम, शौर्य, क्रोध, भूमी यांचा कारक म्हणून मान्यता आहे. त्यामुळे ज्या व्यक्तींच्या पत्रिकेत मंगळ शुभस्थितीत असतो अशा व्यक्ती प्रत्येक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविण्यात सक्षम ठरतात. मंगळ ग्रह काही काळासाठी काही राशींकरीता अतिशय मंगलमय प्रभाव टाकत असल्याचे अनेकांनी अनुभवले आहे. हिंदू पंचांगानुसार मंगळ या ग्रहाने बुधवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी दुपारी पावणेदोन वाजता स्वाती नक्षत्राच्या चौथ्या चरणात प्रवेश केला आहे. सध्या मंगळ ग्रह तूळ राशीत विराजमान आहे. स्वाती नक्षत्राचा स्वामी राहू आहे. या नक्षत्रामध्ये मंगळ ग्रह १३ ऑक्टोबर २०२५पर्यंत विराजमान राहणार असल्याने हा काळ काही राशींच्या व्यक्तींसाठी खूपच अनुकुलता सिद्ध करणारा अर्थातच मंगल करणारा असणार आहे. मंगळाचे नक्षत्रपद गोचर मेष, सिंह व धनू या राशींसाठी अतिशय लाभदायी असल्याने या राशीतील व्यक्तींना गोड फळ मिळते. अनेक अविवाहितांना विवाहाचे प्रस्ताव येतात. नोकरी, व्यावसायिकांच्या कामातही सकारात्मक बदल या काळात घडतात, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते.

**(टीप : सदर माहिती ज्योतिषशास्त्रीय ग्रंथातून संकलीत केली आहे.)**

# पालिकेच्या आरक्षणाने ' कहीं खुशी, कहीं गम '

## मतदारांची आता खऱ्या अर्थाने होणार दिवाळी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दीर्घकाळापासून येथील पालिकेची निवडणुकीची विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, इच्छुक उमेदवार व मतदारही वाट पाहत होते. दोन दिवसांपूर्वी जाहीर झालेल्या नगराध्यक्षपदाचे आरक्षण व बुधवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी जाहीर झालेले प्रभागांचे आरक्षण यामुळे ' कहीं खुशी, कहीं गम 'चे वातावरण आहे.

नगराध्यक्षपदासाठी इच्छुक असलेल्या अनेकांची इच्छापूर्ती न झाल्याने ते कमालीचे नाराज आहेत. काहीशी अशीच परिस्थिती प्रभागांच्या आरक्षणाबाबतही झालेली दिसते आहे. त्यामुळे ' कहीं खुशी, कहीं गम ' असेच वातावरण दिसते आहे. दिवाळी तोंडावर असताना सर्व प्रकारची आरक्षणे जाहीर झाल्याने यंदाच्या दिवाळीपासूनच मतदारांना लक्ष्मी दर्शन, मिठाई, भेटवस्तू, पार्ट्या आदींच्या रुपाने त्यांची खऱ्या अर्थाने दिवाळी होणार आहे.



### लावा रे भो आते निवडणूक जल्दी...!

*पालिकेचा कार्यकाळ उलटल्यानंतरही दीर्घकाळ पालिकेची निवडणुकच झाली नाही. त्यामुळे खूप मोठा काळ इच्छुक उमेदवारांना प्रतीक्षा करावी लागली. प्रतिक्षेच्या काळामध्ये कार्यकर्ते व मतदार यांचे सुख दुःखाचे प्रसंग, वाढदिवस, आजारपण, लग्नकार्य ते उत्तरकार्य, सण- वार आदी प्रसंगी इच्छुक उमेदवारांना चांगलीच आर्थिक चट्टी बसत राहिली होती. आता आरक्षण जाहीर झाले आहे. डिसेंबर किंवा जानेवारीत निवडणुका लागण्याचे संकेत आहेत. मात्र, दीर्घकाळ छोटे- मोठे नेते व कार्यकर्त्यांना झेलून शारीरिक, मानसिक, बौद्धीक व आर्थिकदृष्ट्या थकलेल्या इच्छुक उमेदवारांना कधी निवडणूक लागते आणि कधी नाही, असे झाले आहे. जणू प्रत्येक जण मनातल्या मनात सरकार व निवडणूक आयोगाला उद्देशून हेच म्हणत आहे, की लावा रे भो निवडणूक जल्दी...!*

### अमळनेर नगरपालिकेचे प्रभागनिहाय आरक्षण

| | |
|---|---|
| प्रभाग क्र. १ | |
| अ | सर्वसाधारण (महिला राखीव) |
| ब | सर्वसाधारण |
| प्रभाग क्र. २ | |
| अ | अनुसूचित जाती |
| ब | सर्वसाधारण (महिला राखीव) |
| प्रभाग क्र. ३ | |
| अ | अनुसूचित जमाती (महिला राखीव) |
| ब | सर्वसाधारण |
| प्रभाग क. ४ | |
| अ | अनुसूचित जमाती (महिला राखीव) |
| ब | सर्वसाधारण |
| प्रभाग क. ५ | |
| अ | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ब | सर्वसाधारण (महिला राखीव) |
| प्रभाग क. ६ | |
| अ | अनुसूचित जाती (महिला राखीव) |
| ब | सर्वसाधारण |
| प्रभाग क. ७ | |
| अ | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला राखीव) |
| ब | सर्वसाधारण |
| प्रभाग क्र. ८ | |
| अ | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ब | सर्वसाधारण (महिला राखीव) |
| प्रभाग क. ९ | |
| अ | सर्वसाधारण (महिला राखीव) |
| ब | सर्वसाधारण |
| प्रभाग क. १० | |
| अ | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ब | सर्वसाधारण (महिला राखीव) |
| प्रभाग क्र. ११ | |
| अ | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला राखीव) |
| ब | सर्वसाधारण |
| प्रभाग क्र. १२ | |
| अ | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला राखीव) |
| ब | सर्वसाधारण |
| प्रभाग क्र १३ | |
| अ- | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला राखीव) |
| ब- | सर्वसाधारण |
| प्रभाग क्र १४ | |
| अ | सर्वसाधारण (महिला राखीव) |
| ब | सर्वसाधारण |
| प्रभाग क्र. १५ | |
| अ | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ब | सर्वसाधारण (महिला राखीव) |
| प्रभाग क्र. १६ | |
| अ | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ब | सर्वसाधारण (महिला राखीव) |
| प्रभाग क्र. १७ | |
| अ | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला राखीव) |
| ब | सर्वसाधारण |
| प्रभाग क्र. १८ | |
| अ | अनुसूचित जमाती |
| ब | सर्वसाधारण (महिला राखीव) |

### शेवटी आमदार असतील ' दादा '...!

नगराध्यक्ष व नगरसेवकपदासाठी अनेक उमेदवार इच्छुक आहेत. अनेक जण तर गुढघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत. अमळनेरला राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट), भाजप व शिवसेना (शिंदे गट) यांची महायुती सर्वच बाबतीत मजबूत आहे. खासदार स्मिताताई वाघ व आमदार अनिलदादा पाटील यांच्यामध्ये सर्वच पातळ्यांवर एकजूट आहे. माजी आमदार कृषिभूषण साहेबराव पाटील व अन्य मंडळींनाही विश्वासात घेऊन शक्य तो विकास आघाडी स्थापन होण्याची चिन्हे आहेत. आणि अर्थातच त्याची प्रमुख सूत्रे अनिलदादा पाटील यांच्याकडेच असतील, हेही जवळपास निश्चित आहे. त्यामुळे कोणी कितीही उड्या मारल्या तरी शेवटी कोणाला उमेदवारी द्यावी या निर्णयप्रक्रियेचा ' दादा ' आमदारच असतील, असे स्पष्ट संकेत आहेत.

### विरोधी गटात तूर्तास तरी सामसूम...!

येथे माजी आमदार शिरिषदादा चौधरी, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांनी अजुनही त्यांचे राजकीय कार्डस् ओपन केलेले नाहीत. त्यांच्याकडून उमदेवारी घेण्यासाठी फारसे कोणी उत्सुक असल्याचेही चित्र दिसत नाही. विशेषत्वाने शिरिषदादा चौधरी वेट अॅण्ड वॉचच्या भूमिकेत आहेत. ज्यांना महायुतीकडून उमेदवारी मिळणार नाही अशा नाराजांचा सोबत घेऊन कदाचित ते त्यांचे अस्तित्व दाखविण्याचा प्रयत्न करतील. पण तूर्तास तरी सारे काही सामसूम आहे.

# देवेंद्र फडणवीसांचे उत्तर मन जिंकणारे!

## एका दिवसासाठी दिग्दर्शक बनलात, तर ' महाराष्ट्र ' चित्रपटाचा पहिला सीन कोणता शूट कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

' फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्री 'च्या कार्यक्रमात अभिनेता अक्षय कुमारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीत अक्षयने फडणवीसांना विविध प्रश्न विचारले. त्यापैकी एक प्रश्न होता, की जर तुम्ही एका दिवसासाठी चित्रपटाचे दिग्दर्शक बनलात आणि चित्रपटाचे नाव ' महाराष्ट्र ' असेल. तर पहिला सीन कोणता शूट कराल? फडणवीस काय म्हणाले ?

' महाराष्ट्र ' चित्रपटाचा पहिला सीन हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा असेल. इतक्या वर्षांच्या गुलामगिरीनंतर स्वराज्याची स्थापना करणारा तो ऐतिहासिक क्षण मी चित्रित करेन, असे श्री. फडणवीस यांनी सांगितले. त्यांच्या या उत्तराने उपस्थितांचे लक्ष वेधले. यानंतर अक्षयने विचारले, की राजकारणातील खरे हिरो कोण वाटतात? यावर



श्री. फडणवीसांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव घेत त्यामागील कारणे सविस्तर सांगितली.

**मराठी चित्रपटांबद्दल काय म्हणाले?**

अक्षयने मराठी चित्रपटांबाबत प्रश्न विचारला, की मराठी चित्रपटांचा स्क्रीनप्ले, पटकथा आणि मांडणी इतरत्र दुर्मीळ आहे. जेन झी वर्गापर्यंत मराठी चित्रपट पोहोचवण्यासाठी तुमचा काही प्लॅन आहे का? यावर श्री. फडणवीस म्हणाले, की मराठी रंगभूमीने मराठी चित्रपटांना भक्कम पाठबळ दिले आहे. मराठी नाटके ही कल्पकता आणि अभिव्यक्तीचे उत्तम उदाहरण आहेत. आजही महाराष्ट्रात अनेक मराठी नाटकांना प्रेक्षकांची गर्दी उसळते. ' नटरंग ', ' दशावतार ' किंवा ' सखाराम बाइंडर ' यांसारख्या नाटकांना जेन झी प्रेक्षकांकडूनही पसंती मिळते. मराठी चित्रपट आता जेन झीशी जोडले जात आहेत. ते पुढे म्हणाले, की पूर्वी मराठी चित्रपटांना थिएटर्स मिळणे कठीण होते. एखादा ब्लॉकबस्टर चित्रपट आला, तर मराठी चित्रपटांचे प्रदर्शन पुढे ढकलले जायचे. मात्र आता एकाच दिवशी दोन मराठी चित्रपट प्रदर्शित होऊन ब्लॉकबस्टर ठरतात. सरकार म्हणून आम्ही मराठी चित्रपटसृष्टीला प्रोत्साहन देत आहोत. यासाठी काही योजना कार्यान्वित आहेत. जेन झी प्रेक्षकांना मराठी चित्रपटांशी अधिक जोडण्यासाठी आम्ही निश्चितपणे प्रयत्न करू, असे आश्वासन त्यांनी दिले.

# ठाणे जि. प. सीईओ रोहन घुगे जळगावचे नवे जिल्हाधिकारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्हाधिकारीपदी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांची जिल्हाधिकारीपदी नियुक्ती झाली. याबाबतचे आदेश त्यांना मंगळवार, दि. ०७ ऑक्टोबर रोजी प्राप्त झाले आहेत.

श्री. घुगे १९ जून २०२४ मध्ये ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारीपदी रुजू झाले होते. त्यांनी ठाणे जिल्हा परिषदेतील प्रशासकीय कामकाज पारदर्शक पद्धतीने आणि गतिमान करण्यावर भर दिला. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी, स्पर्धा परिक्षेसाठी हे विद्यार्थी तयार व्हावे, यासाठी त्यांनी कृत्रीम बुद्धिमत्ता (एआय) चा वापर करुन दिशा प्रकल्प हाती घेतला होता. याप्रकल्पाचे राज्यभरातून खूप कौतूक झाले होते.

ग्रामीण भागातील शिक्षण डिजिटलायझेशन करणे, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील गुणवत्ता सुधारणे यावर त्यांनी विशेष भर दिला. ग्रामीण भागातील आरोग्यसेवेला बळकटीकरण करण्याचे काम त्यांनी केले. जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील दापूरमाळ या आदिवासी वाडीवरील स्वतः जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या होत्या. तेथील रस्ते, शाळा यासह घरकुलांचे प्रश्न त्यांनी मार्गी लावले. स्वातंत्र्यदिनी तेथील रस्त्याच्या कामाचा नारळही वाढवला होता. ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कामांच्या पोचपावती म्हणून श्री. घुगे यांना जळगाव जिल्हाधिकारीपदी नियुक्ती झाल्याची चर्चा आहे.




# अबब...! तांबेपुरामध्ये ८ फूट लांबीचा अजगर !

## सर्पमित्र, वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सुरक्षितपणे सोडले जंगलात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तांबेपुरा परिसरात मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ फूट लांबीचा अजगर आढळला. यामुळे काही काळ नागरिक भयभीत झाले होते. मात्र, सर्पमित्र व वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी त्याला पकडून सुरक्षितपणे जंगलात सोडले.

भूषण पाटील हे त्यांच्या शेतात काम करत होते. त्यांना झाडीत मांजराच्या पिल्लांचा रडण्याचे आवाज ऐकू आला. तेथे जाऊन पाहिले असता त्यांना एका मोठ्या अजगराने पिलाला विळखा घालत असल्याचे दिसले. त्यांनी ही बाब सर्पमित्र अविनाश परमार, अजित पिंजारी, निखिल बोरसे व अक्षय उदेवाल यांना सांगितली. त्यांनी अजगराला सुरक्षितपणे पकडले. त्यानंतर श्री. पाटील यांनी वन विभागास



कळविले. निवृत्त सहायक पोलिस उपनिरीक्षक प्रभाकर भामरे, वनरक्षक गुलाब पिंजारी आणि दुर्गादास वानखेडे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी अजगराची तपासणी केली. तो सुमारे ८ फूट लांबीचा आणि १४ किलो वजनाचा असल्याचे सांगितले. अजगराच्या शरीरावर कोणतीही दुखापत नसल्याने तो पूर्णपणे निरोगी असल्याचे निष्पन्न झाले. वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली दुर्गादास वानखेडे यांच्या उपस्थितीत अजगराला राखीव वनक्षेत्रात सुरक्षितपणे सोडण्यात आले. अशा प्रजातीचा अजगर सुमारे ३२ वर्षांपर्यंत जगू शकतो, दोन वर्षांनी एकदा आहार घेतो, अशी माहिती प्रकाश भामरे यांनी दिली. पुरामुळे हा अजगर नदीकाठावरून गावाच्या हद्दीत आला असावा, असा अंदाज वर्तविण्यात आला. साप किंवा वन्यप्राणी दिसल्यास घाबरू नये, त्यांना मारू नये. तातडीने वनविभागाशी संपर्क साधावा. जीवसृष्टी पर्यावरणाचा अविभाज्य घटक असून आहे. त्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले.

# अवैध वाळू साठ्याप्रकरणी २९ कोटींपेक्षाही अधिक दंड!

## गडचिरोलीच्या जिल्हाधिकाऱ्यांचा वाळूमाफियांना दणका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संपूर्ण राज्याच्या प्रशासनासाठी अनुकरणीय व प्रेरणादायी कर्तव्यकठोर निर्णय गडचिरोलीचे जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी घेतला आहे. तेथील वाळूमाफियांना तब्बल २९ कोटी रूपयांपेक्षाही अधिक दंड प्रस्तावित करून त्यांनी वाळू माफियांचे पार कंबरडे मोडले आहे. वर्षानुवर्ष दादागिरी करणाऱ्या वाळू माफियांची त्यांनी पार मस्ती जिरवली आहे.

गडचिरोली जिल्ह्यात दीर्घकाळापासून वाळूमाफियांची प्रचंड मुजोरी व मनमानी सुरू होती. अर्थात त्यांना पोलिस व प्रशासनातील अधिकारी व काही राजकीय मंडळी यांचे सहकार्य असेलच. याबद्दल कर्तव्यकठोर असलेले जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांच्याकडे काही संवेदनशिल लोकांनी गंभीर तक्रारी केल्या. याबाबत त्यांनी जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले. मात्र, या अधिकाऱ्यांनीही (भ्रष्ट) ' सब आलबेल है ' असाच निर्वाळा दिला. प्रत्यक्षात मात्र मोठ्या प्रमाणावरर वाळू माफियागिरी सुरू होती. याबाबत सिरोंचा विभागातील काही निडर व निष्पक्ष प्रसारमाध्यमांनी बातम्या लावून वस्तुस्थिती जिल्हाधिकारी श्री. पंडा यांच्या लक्षात आणून दिली. त्यामुळे श्री. पंडा यांनी अहेरीचे उपविभागीय अधिकारी कुशल जैन यांना माफियागिरी बाबतचे स्वयंस्पष्ट व वस्तुस्थितीवर आधारीत माहिती देण्याचे आदेश दिले. श्री. जैन यांनी जेथे वाळू माफियागीरी सर्वाधिक होत होती त्या ठिकाणचा दौरा केला. तेथे त्यांना १५ हजार ६६५ ब्रास अवैध वाळूसाठा आढळला. सदर वाळू साठा साठवणूक आणि वाहतुकीसाठी संबंधितांकडे कोणताही कायदेशीर परवाना नव्हता. गौण खनिज उत्खनन व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले दोन जेसीबी मशिन, एक पोकलँड मशिन, पाच ट्रक श्री. जैन यांनी जप्त केले. संपूर्ण वाळू साठा अवैध घोषित करून तोही जप्त केला. सदर वाळू साठ्यासाठी प्रतिब्रास १८ हजार ६०० रुपये दंड आकारणी केली. ती रक्कम २९ कोटी ३६ लाख ५६ हजार ८०० रुपये प्रस्तावित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी श्री. पंडा व उपविभागीय अधिकारी श्री. जैन या दोनच प्रामाणिक व कर्तव्यकठोर

अधिकाऱ्यांनी वाळू माफियांना जोरदार हिसका दिला. दूर्दैवाची बाब म्हणजे वर्षानुवर्ष तेथील संबंधित शासकीय यंत्रणा नोटांच्या बंडलांच्या ओझाखाली दबून आवाज करत नव्हती. त्यांचीही चौकशी होऊन त्यांच्यावरही कारवाई व्हावी, अशी प्रसिद्धीमाध्यमांनी मागणी केली आहे.



### वापरा पंडा यांचा फंडा...! सिद्ध करा स्वत:ला बॉस...!!

गडचिरोलीचे जिल्हाधिकारी श्री. पंडा व उपविभागीय अधिकारी श्री. जैन यांनी प्रामाणिक व कर्तव्यकठोरता दाखवून आम्ही खरोखर बॉस आहोत, हे सिद्ध केले आहे. त्यांच्या कामगिरीच्या २५ टक्के जरी कामगिरी जळगाव जिल्ह्यातील संबंधित शासकीय यंत्रणेने केली तरी कोट्यावधी रूपयांचे गौण खनिज सापडेल. विशेष म्हणजे कोट्यावधी रुपयांचा दंड शासनाचा तिजोरीत जमा होईल. आगामी काळात श्री. पंडा व श्री. जैन यांच्यापासून प्रेरणा घेऊन कोणीतरी अधिकाऱ्यांना काहीतरी प्रभाव दाखवावा व आपण बॉस आहोत हे सिद्ध करावे, अशी मागणी जळगाव जिल्ह्यातील प्रसिद्धीमाध्यमे व पर्यावरणप्रेमींनी केली आहे.



# ‘ होता जीवा म्हणून वाचला शिवा ’

## वीर मावळा जीवा महाला यांच्या प्रामाणिकतेची शौर्य गाथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे केवळ त्यांच्या दूरदृष्टी, शौर्य आणि ध्येयनिष्ठेसह त्यांच्या विश्वासू आणि पराक्रमी मावळ्यांच्या बलिदानामुळे घडले. त्या शूर मावळ्यांमध्ये एक नाव इतिहासाच्या पानांवर सुवर्णाक्षरांनी कोरले गेले ‘ जीवा महाला ’. त्यांचा पराक्रम, निष्ठा आणि बुद्धिमत्ता आजही सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.

**बालपण आणि प्रारंभीचे जीवन**

जीवा महाला यांचा जन्म ९ ऑक्टोबर १६५५ रोजी सातारा जिल्ह्यातील कोंढवली गावात झाला. त्यांचे वडीलही सैनिक होते. मात्र ते युद्धात जखमी झाल्याने त्यांना अपंगत्व आले होते. आई-वडिलांच्या निधनानंतर जीवा यांचे पालनपोषण नातेवाईक देव महाले यांनी केले. बालपणापासूनच त्यांच्यात अद्भुत चपळाई, धाडस आणि शस्त्रकलेची आवड होती. गावातील पारंपरिक मर्दानी खेळ, तलवारबाजी आणि घोडेस्वारी यात जीवा पारंगत झाले. हीच कौशल्ये त्यांना पुढे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अंगरक्षक दलात घेऊन गेली.

**प्रतापगडची ऐतिहासिक घटना ‘ होता जीवा म्हणून वाचला शिवा’**

सन १६५९ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडावर अफझलखानचा कोथळा बाहेर काढून त्याला ठार केले. प्रतापगडावर उडालेल्या चकमकीत खानाचा रक्षक सय्यद बंडा महाराजांवर तलवारीने वार करण्यासाठी झेपावला. त्या क्षणी बाजूला उभा असलेला जीवा महाला वीजेप्रमाणे पुढे सरसावला. त्याने सय्यद बंडाचा हात एका घावात छाटला आणि शिवरायांचे प्राण वाचविले. त्या प्रसंगानंतर ‘ होता जीवा म्हणून वाचला शिवा ’ ही म्हण महाराष्ट्राच्या लोकजीवनात अमर झाली. हे केवळ म्हण नव्हते, तर एका सैनिकाच्या निष्ठेचा, वेगाचा आणि न डगमगणाऱ्या धैर्याचा पुरावा होता.

**शिवरायांचा अंगरक्षक आणि पराक्रमी मावळा**

जीवा महाला शिवाजी महाराजांच्या अंगरक्षक दलातील अत्यंत विश्वासू व शूर सहकारी होते. युद्धात ते अत्यंत सतर्क, निर्धारयुक्त आणि बुद्धिमान योद्धा म्हणून ओळखले जात असे. त्यांच्याकडे शत्रूची हालचाल ओळखण्याचे विलक्षण कौशल्य होते. महाराज जेव्हा किल्ल्यांवरून मोहिमा आखत तेव्हा जीवा अग्रभागी असायचे. इतिहासात त्यांचे नाव ‘शिवरायांची ढाल आणि तलवार’ म्हणून अभिमानाने घेतले जाते.

**उत्तरायुष्यातील परिस्थिती आणि समाधीस्थान**


प्रतापगडच्या युद्धानंतर जीवा महाला विविध लढायांमध्ये सहभागी झाले. त्यांच्या मृत्यूविषयी ठोस ऐतिहासिक पुरावे कमी आहेत. परंतु त्यांची समाधी रायरेश्वर पर्वताजवळील आंबवडे गावाजवळ असल्याचे सांगितले जाते. त्यांचे वंशज आजही सातारा जिल्ह्यातील कोंढवली गावात वास्तव्यास आहेत. मात्र दुर्दैवाने या पराक्रमी योद्ध्याच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची आहे.

**जीवा महाला यांच्या वंशजांची वर्तमान अवस्था**

काळाच्या ओघात जीवा महाला यांचा शूरपणाचा इतिहास विसरला गेला. त्याचबरोबर त्यांच्या वंशजांचाही लोकांना विसर पडला. काही वर्षांपूर्वी वृत्तपत्रांनी त्यांच्या दारिद्र्याचे वृत्त प्रसिद्ध केले. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी लताताई शिंदे यांनी जीवा महाला यांच्या वंशजांना मदत केली. तसेच त्यांच्या कुटूंबातील विवाहासाठी सहाय्य केले आणि प्रशासनाकडे मदतीची मागणी केली. काही सामाजिक संस्था आणि शिक्षण संस्था त्यांच्या कुटुंबासाठी पुढे आल्या. परंतु अद्यापही त्यांना स्थिर सहाय्याची गरज आहे.

### स्मृतीत राहणारा मावळा

जीवा महाला हे फक्त शिवरायांचे एक अंगरक्षकच नव्हते. तर ते स्वराज्यासाठी झटणारे कट्टर सैनिक आणि मराठी शौर्याचे प्रतीक होते. त्यांच्या नावाने शाळा, स्मारक आणि सार्वजनिक कार्यक्रम व्हावेत, हे महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. त्यांच्या पराक्रमाची गाथा आजही लोकगीतांमध्ये, शालेय पुस्तकांमध्ये आणि मराठी लोकांच्या हृदयात जीवंत आहे. जीवा महाला म्हणजे मराठी माणसाच्या बाण्याचा मूर्तिमंत अविष्कार होय. त्यांनी हे दाखवून दिले आहे की, खरा वीर फक्त रणांगणात नव्हे, तर निष्ठा आणि कर्तव्याच्या क्षेत्रातही लढवय्या आणि प्रामाणिक असावा.



# कढीपत्ता : आरोग्यवर्धक औषधी वनस्पती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सर्वसाधारणपणे कढीपत्ता हा स्वयंपाकात फक्त फोडणीसाठी वापरतो, असे अनेकांना वाटते. मात्र प्रत्यक्षात कढीपत्ता औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. दक्षिण भारतात जवळपास प्रत्येक घराच्या बागेत आढळणारा हा कढीपत्ता रोजच्या जेवणात वापरला जातो. त्याचे आरोग्यदायी फायदे नेमके काय-काय आहेत ते खालीलप्रमाणे :

**कढीपत्त्याचे आरोग्यवर्धक फायदे केसांच्या आरोग्यासाठी :** कढीपत्त्यात बीटा-कॅरोटीन आणि प्रोटीन मुबलक असतात. जे केसांच्या मुळांना बळकट करतात. तसेच केस गळणे, तुटणे रोखणे आणि नवीन केस उगवण्यास मदत करते. पांढऱ्या केसांवर नैसर्गिक हेअर टॉनिक म्हणूनही कार्य करते.

**पचनसंस्थेसाठी :** यातील तंतुमय पदार्थ (फायबर) पोट स्वच्छ ठेवतात. नैसर्गिक एन्झाइम्समुळे अन्न जलद आणि योग्यरित्या पचते. ज्यामुळे गॅस, ॲसिडिटी आणि बद्धकोष्ठता यांसारख्या समस्या टाळता येतात.

**मधुमेह नियंत्रणासाठी :** कढीपत्ता रक्तातील साखरेचे प्रमाण संतुलित ठेवतो आणि इन्सुलीनची कार्यक्षमता सुधारतो. मधुमेहींसाठी नियमित सेवन फायदेशीर आहे.

**यकृत (लिव्हर) डिटॉक्ससाठी :** यातील अँटिऑक्सिडंट्स यकृत स्वच्छ करतात आणि विविध आजारांपासून संरक्षण देतात.

**त्वचेसाठी सौंदर्यवर्धक :** जीवनसत्त्व ए आणि सी त्वचेला तेजस्वीपणा देतात आणि सुरकुत्या टाळतात. त्वचेचे नैसर्गिक सौंदर्य वाढविण्यास मदत करतात.

**वजन कमी करण्यासाठी :** कढीपत्ता चयापचय (मेटाबॉलिझम) वाढवतो. ज्यामुळे चरबी जलद जळते आणि शरीर हलके राहते.

**कढीपत्त्याचा आहारात समावेश**

डाळ, भाजी, सांबार, चटणी किंवा लिंबूपाण्यात सहज करता येतो. ताज्या पानांचा वापर केल्यास सर्वोत्तम फायदे मिळतात. कढीपत्ता केवळ स्वयंपाकाची चव वाढवत नाही, तर केस, त्वचा, पचनसंस्था, यकृत आणि मधुमेह नियंत्रणासाठीही उपयुक्त आहे. याचा नियमित आहारात समावेश करून आपण निरोगी आणि सुदृढ जीवनाचा आनंद घेऊ शकतो.




# विराटच्या तीन शब्दांच्या पोस्टची कमाल : १५ तासांत ९० लाख लाइक्स!

भारतीय क्रिकेटचा स्टार फलंदाज विराट कोहलीने पुन्हा एकदा सोशल मीडियावर खळबळ माजविली. सहसा सोशल मीडियापासून दूर राहणाऱ्या विराटने इंस्टाग्रामवर पत्नी अनुष्का शर्मासोबत एक फोटो शेअर केला. जो व्हायरल झाला. फोटोत अनुष्का बसलेली असून विराट तिच्यामागे जवळ उभा आहे. कॅप्शन फक्त तीन शब्दांचे : Been a minute. सुप्रसिद्ध गायक लाय ॲने पिनॉक हिने गायिलेल्या गाण्यातील हे सुप्रसिद्ध बोल आहेत. याचा अर्थ खूप वेळ झाला किंवा बऱ्याच काळापासून भेटलो नाही, असा होते. खरेतर दोन व्यक्तींची जेव्हा दीर्घकाळानंतर भेट होते त्यावेळी हा शब्दप्रयोग वापरला जातो. अवघ्या १५ तासांत या पोस्टला ९० लाखांहून अधिक लाइक्स मिळाले. हा स्वतःच एक विक्रम ठरला आहे.

**निवृत्तीनंतरही लोकप्रियता कायम**

कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतरही विराटची लोकप्रियता अफाट आहे. अलीकडच्या अहवालानुसार तो भारतातील सर्वांत लोकप्रिय सेलिब्रिटी ब्रँड आहे. चाहत्यांनी या पोस्टवर उत्साहाने प्रतिक्रिया दिल्या. काहींनी त्याला GOAT (सर्वकालीन महान) म्हटले, तर काहींनी विराट-अनुष्काच्या जोडीचे कौतुक केले. मैदानाबाहेरही विराटचे आकर्षण निर्विवाद आहे.

**लंडनमध्ये प्रशिक्षण, आयपीएलमध्ये कमाल**

सध्या विराट कुटुंबासह युनायटेड किंग्डममध्ये आहे. जेथे त्याने फिटनेस टेस्ट दिली. बोर्डाने सूट दिली असली, तरी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत तो पुनरागमन करेल, अशी अपेक्षा आहे. आयपीएल २०२५ मध्ये विराटने रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूसाठी (आरसीबी) ६५७ धावा करत पहिली ट्रॉफी जिंकून दिली आणि सर्वांत यशस्वी फलंदाज ठरला.

**प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व**

विराट कोहलीचा हा प्रवास चाहत्यांना सतत प्रेरणा देतो. मैदानावरील कामगिरी असो वा सोशल मीडियावरील प्रभाव, तो नेहमीच चर्चेत राहतो. त्याची ही पोस्ट पुन्हा एकदा त्याच्या अतुलनीय लोकप्रियतेची साक्ष आहे.



# मोराविषयी रोचक माहिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मोर हा भारताचा राष्ट्रीय पक्षी आहे. त्याच्या रंगबिरंगी पंखांसाठी तो जगभरात प्रसिद्ध आहे. आपल्याला माहिती आहे का, की मोर किती दिवसांत जन्माला येतो? मोराची अंडी साधारण २८ ते ३० दिवसांत उबवली जाते आणि त्यातून पिल्लू बाहेर येते. आश्चर्य वाटले ना?

**मोराच्या प्रमुख जाती**

जगभरात मोराच्या तीन प्रमुख जाती आढळतात.

**भारतीय मोर (Pavo cristatus) :** भारत, श्रीलंका आणि बांगलादेश यांसारख्या दक्षिण आशियायी देशांमध्ये आढळतो.

**हिरवा मोर (Pavo muticus) :** दक्षिण-पूर्व आशियातील उष्णकटिबंधीय जंगलांमध्ये आढळतो. मलेशिया, थायलंड आणि जावा येथे तो प्रामुख्याने अधिक आढळतो.

**आफ्रिकी कांगो मोर (Afropavo congensis) :** मध्य आफ्रिकेतील कांगोच्या जंगलांमध्ये आढळतो.

**मोराची वैशिष्ट्ये**

**पंखांचा त्याग :** मोर दरवर्षी ऑगस्ट-सप्टेंबर दरम्यान आपले पंख गळवतो आणि नवे पंख तयार करतो. या प्रक्रियेला ‘ मोल्टिंग ’ म्हणतात.

**आयुष्यमान :** मोराचे सरासरी आयुष्य १५ ते २० वर्षे असते. योग्य काळजी आणि अनुकूल वातावरणात ते २५ वर्षांपेक्षा जास्त जगू शकतात.

**वेग आणि चपळता :** मोराचा धावण्याचा वेग ताशी १३-१६ किलोमीटर असतो. ते उंच उड्या मारू शकतात आणि घनदाट झाडी-झुडपातून सहज चालू शकतात.

**आहार :** मोर सर्वभक्षी आहे. तो धान्य, कीटक, लहान सरपटणारे प्राणी आणि अगदी सापही खातो. होय, मोर सापांना खातो. यामुळे तो शेतकऱ्यांचा मित्र मानला जातो.

**सौंदर्य आणि सामर्थ्य**

मोराचे सौंदर्य त्याच्या रंगबिरंगी पंखांमुळे सर्वांना आकर्षित करते. मात्र त्याची ताकद आणि चपळता यामुळे तो जंगलातही तितकाच प्रभावी आहे. याला म्हणतात, सौंदर्य आणि सामर्थ्याचा अनोखा संगम.



# पोटात गुडगुड आवाजाची कारणे आणि उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पोटात सतत गुडगुड आवाज, गॅस, अपचन किंवा फुगण्याची समस्या ही पचनतंत्राच्या बिघाडामुळे प्रामुख्याने उद्भवत असते. सामान्य वाटणारी ही समस्या टाळण्यासाठी वाळलेले खोबरे एक साधा आणि प्रभावी उपाय आहे.

**वाळलेले खोबरे का फायदेशीर ?**

**पचन सुधारते :** वाळलेले खोबरे पचनक्रिया सुलभ करते. आतड्यांतील उष्णता कमी करते.

**गॅस प्रतिबंधक :** यातील नैसर्गिक तेल गॅस निर्मिती थांबविते आणि पोट शांत ठेवते. औषधांऐवजी कोरड्या खोबऱ्याची चव आनंददायी आहे.

**उपाय :** जेवणानंतर एक चमचा वाळलेले खोबरे चावून खा. रोज ही सवय ठेवल्यास पचन सुधारते. गुडगुड आवाज, गॅस यांसारख्या समस्याही तत्काळ कमी होतात.

**सावधानता :** जर समस्या कायम राहिली, तर वैद्यकीय सल्ला घ्यावा. कारण यामागे इतर कारणेही असू शकतात.

वाळलेले खोबरे हा पचनासाठी नैसर्गिक आणि सोपा उपाय आहे. याचा आहारात समावेश करा आणि पोट शांत ठेवा. कारण पोट शांत, तर मन शांत.

# जागतिक टपाल दिन : विश्वासार्ह सेवेचा उत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

‘ डाकीयाँ डाक लाया ’ या गाण्याचे बोल आजही अनेकांच्या स्मरणात आहेत. पोस्टमनची सेवा व भूमिका किती महत्वाची आहे, हेच त्यांच्यावर आधारीत चित्रपट व गाण्यातून लक्षात येते.

भारतीय टपाल सेवा ही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनलेली आहे. इंटरनेटच्या युगात संदेशवहन जलद होते. मात्र तरीही टपाल विभागाचे महत्त्व अबाधित आहे. शहरी भाग सोडला, तर अजूनही दुर्गम भागात सर्व प्रकारच्या सुख-दुःखाची, व्यवहारांची, कायदेशीर नोटीसांची, आमंत्रणांची पत्रे पोस्टाद्वारेच जातात. पूर्वीच्या तुलनेने हे प्रमाण कमी झाले असले तरी संपलेले नक्कीच नाही. लाल रंगाची टपाल पेटी ही केवळ पत्र पाठविण्याचे साधन नव्हे, तर ती गावोगावी भावनांचा दुवा बनली आहे. दुर्गम भागातील खेड्यांमध्ये टपाल पेटी आणि पोस्टमन यांचे स्थान आजही कायम आहे.

**टपाल सेवेचा प्रारंभ व जागतिक टपाल दिन**

भारतात टपाल सेवेची सुरूवात १० ऑक्टोबर १८५४ रोजी लॉर्ड डलहौसी यांनी केली. या ऐतिहासिक घटनेमुळे भारतात टपाल दिन १० ऑक्टोबर रोजी साजरा होतो. मात्र जगभरात ९ ऑक्टोबर हा जागतिक टपाल दिन म्हणून पाळला जातो. युनिव्हर्सल पोस्टल युनियनच्या स्थापनेनंतर टपाल सेवेला जागतिक स्तरावर गती मिळाली. १८७४ मध्ये स्वित्झर्लंडमधील बर्न येथे झालेल्या कराराद्वारे युनिव्हर्सल पोस्टल युनियनची स्थापना झाली. ज्यावर २२ देशांनी सह्या केल्या. विशेष म्हणजे युनिव्हर्सल पोस्टल युनियनचा सदस्य होणारा भारत हा पहिला आशियायी देश ठरला. पुढे १९६९ मध्ये जपानमधील टोकियो येथे झालेल्या परिषदेत जागतिक टपाल दिन साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**टपाल सेवेचे महत्त्व अनन्यसाधारण**

टपाल सेवा ही पत्र, पार्सल किंवा पैसे पाठविण्याचे सर्वांत रास्त, सोपे आणि विश्वासार्ह साधन मानले जाते. देशाच्या कानाकोपऱ्यातून जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात संदेश आणि वस्तू पाठविण्याची सुविधा टपाल खाते प्रदान करते. पोस्टमन हा या सेवेचा कणा आहे. कडक ऊन, पाऊस, थंडी याची तमा न बाळगता अगदी पोस्ट कार्डही ते खेड्या-पाड्यांतील घरापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी ते निष्ठेने पार पाडतात. आजही पोस्टमन यांना समाजात आदराचे, आपलेपणाचे, कामाचा माणूस म्हणून स्थान आहे. पत्र हातात पडण्यापर्यंतची उत्सुकता आणि धाकधूक ही टपाल सेवेची खासीयत आहे.

**टपाल सेवेचे बदलते स्वरूप**

गेल्या दोन दशकांत काळानुरूप इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापराने टपाल सेवेला आव्हान दिले आहे. डाक एक्स्प्रेस, स्पीड पोस्ट, ऑनलाइन ट्रॅकिंग आदी ५० हून अधिक प्रकारच्या ई-पोस्टल सेवेमुळे टपाल खाते आजही लोकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. ऑनलाइन खरेदीच्या युगात पार्सल सेवेचा वापर वाढला आहे, तर मनी ऑर्डर आणि बँकिंग सेवांमुळे ग्रामीण भागातील लोकांना आर्थिक व्यवहार सोपे झाले आहेत. टपाल खाते आता केवळ पत्रवहनापुरते मर्यादित राहिलेले नसून बँकिंग, विमा, आणि ई-कॉमर्स क्षेत्रातही चांगल्या प्रकारे योगदान देत आहे. उदा.- इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकने ग्रामीण भारतात बँकिंग सेवा पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**टपाल सेवेची सांस्कृतिक अन् भावनिक जोड**

टपाल सेवेचे स्थान केवळ व्यावहारिक नव्हे, तर सांस्कृतिक आणि भावनिकदृष्ट्याही महत्त्वाचे आहे. टपाल सेवेने समाजाला जोडण्याचे अतिशय महत्त्वपूर्ण कार्य केले आहे व करीत आहे. टपालसेवा विश्वासार्हतेमुळे लोकांच्या मनात कायम आदराचे स्थान ठेऊन आहे. जागतिक टपाल दिन हा टपाल सेवेच्या योगदानाचा अनमोल उत्सव आहे. तंत्रज्ञान कितीही बदलले, तरी टपाल सेवेची विश्वासार्हता आणि सर्वसामान्यांशी असलेली भावनिक नाळ कायम आहे. त्यामुळे या दिनी आपण सर्वांनी टपाल सेवेचा वापर करून तिचे महत्त्व जपत पोस्टमनसारख्या कर्मचाऱ्यांच्या निष्ठावान सेवेचा समाजाकडून सन्मान व्हावा, एवढे मात्र निश्चित!

### जागतिक टपाल दिनाचा उद्देश

जागतिक टपाल दिन साजरा करण्यामागील उद्देश हा आहे, की लोकांमध्ये टपाल सेवेबद्दल जागरूकता निर्माण करणे व वापर वाढविणे. टपाल सेवा ही केवळ संदेशवहनाचे साधन नसून, सामाजिक आणि आर्थिक विकासाचा महत्त्वाचा आधार आहे. ग्रामीण आणि शहरी भाग यांच्यातील दरी कमी करण्यात तसेच जागतिक संपर्क वाढविण्यात टपाल सेवेचा खारीचा वाटा आहे. UPU च्या मार्गदर्शनाखाली जगभरातील टपाल खाती नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब करीत आहेत. याद्वारे टपाल खाते आपली सेवा अधिक कार्यक्षम बनवत आहेत.




हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# चांदीच्या दागिन्यांवर सोन्याच्या मुलाम्यासह बनावट हॉलमार्क ; कल्याणमध्ये बंटी–बबलीचा नवा कारनामा; पोलिसही हादरले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कल्याणमध्ये चांदीच्या दागिन्यांवर सोन्याचा मुलामा चढवून आणि बनावट BIS हॉलमार्क वापरून सोनारांची फसवणूक करणाऱ्या बंटी–बबली जोडीला पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात पुणे कनेक्शनही समोर आले आहे. दरम्यान, पोलिसांकडून तपास सुरू आहे.

**कल्याणमधील धक्कादायक गुन्हा**

गेल्या काही दिवसांत गुन्हेगारीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. त्यातच आता चांदीच्या दागिन्यांवर सोन्याचा मुलामा चढवून आणि बनावट BIS हॉलमार्क लावून ज्वेलर्सना फसवण्याचा एक नवा आणि धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कल्याणमध्ये अवघ्या तीन दिवसांत बंटी–बबलीच्या भामट्या जोडीने दोन ज्वेलर्सना लाखोंचा चुना लावला. तिसऱ्या प्रयत्नातही त्यांनी असाच डाव खेळण्याचा प्रयत्न केला. परंतु एका ज्वेलरच्या सतर्कतेमुळे ही जोडी महात्मा फुले पोलिसांच्या जाळ्यात अडकली.

नेमके काय घडले?

अश्विनी सागर शेवाळे (वय ३२) आणि मयूर विनोद पाटोळे (वय ३४) अशी या बंटी–बबली जोडीची नावे आहेत. कल्याण पश्चिमेतील मुख्य बाजारपेठेत त्यांनी आपला डाव खेळला. या दाम्पत्याची कार्यपद्धती अशी होती की, ते चांदीच्या वस्तूंवर सोन्याचा मुलामा चढवत आणि त्यावर बनावट BIS हॉलमार्कचा शिक्का मारत. नंतर आजारपणाचे खोटे कारण सांगून किंवा पैशांची गरज असल्याचे भासवून हे दागिने ज्वेलर्सकडे गहाण ठेवत. या दागिन्यांवरील BIS हॉलमार्कमुळे ज्वेलर्सना ते खरे सोने वाटायचे, ज्यामुळे त्यांचा संशय दूर होत असे. या पद्धतीने या जोडीने दोन ज्वेलर्सना सहजपणे फसवले.

### आरोपींना अटक; पुणे कनेक्शन उघड

दोन ज्वेलर्सना फसविल्यानंतर तिसऱ्या ज्वेलरकडेही त्यांनी असाच प्रयत्न केला. मात्र, या ज्वेलरला काहीतरी गडबड असल्याचा संशय आला. त्याने तातडीने महात्मा फुले पोलिसांशी संपर्क साधला. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासून या दाम्पत्याचा शोध घेतला आणि ठाण्यातून अश्विनी शेवाळे आणि मयूर पाटोळे यांना अटक केली.



### पुण्यातील साथीदारही पोलिसांच्या जाळ्यात

सदर दाम्पत्याची कसून चौकशी केली असता बनावट दागिन्यांवर हॉलमार्कचा शिक्का पुण्यातील शरण शिलवंत या व्यक्तीने मारल्याचे उघड झाले. यानंतर महात्मा फुले पोलिसांनी तातडीने पुणे गाठत सापळा रचला आणि बनावट हॉलमार्क बनवणाऱ्या शरण शिलवंत यालाही अटक केली. या तिघांनी मिळून किती जणांची फसवणूक केली. या गुन्ह्यात आणखी कोण सहभागी आहे, याचा तपास सध्या महात्मा फुले मंडई पोलीस ठाण्याचे कर्मचारी करीत आहेत.

## सोन्याच्या दागिन्यांची शुद्धता कशी तपासून पाहावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सणासुदीच्या काळात सोने मोठ्या प्रमाणात खरेदी केले जाते. हे तुम्ही मोबाईल वापरून दागिने शुद्ध आहेत की नाही हे तपासू शकता. HUID वापरून हे करता येईल.



**ॲप डाऊनलोड करा :** BIS केअर ॲप डाऊनलोड करा. ते गुगल प्ले स्टोअर, आयफोन ॲप स्टोअरवर उपलब्ध. डेव्हलपर ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्डस् आहे याची खात्री करा.

**हॉलमार्क तपासा :** असलेल्या दागिन्यांवर BIS लोगो आणि कॅरेट मूल्य (२२ K/१८ K) स्पष्टपणे दिसले पाहिजे. दागिन्यांचा ६–अंकी HUID क्रमांक देखील असावा.

**HUID पडताळणी करा :** BIS केअर ॲप पडताळणी HUID पर्याय करेल. त्यावर टॅप करा. नवीन उघडलेल्या विंडोमध्ये, दागिन्यांचा HUID क्रमांक टाईप करा. शोध बटन दाबा.

**तपशील तपासा :** दागिन्यांची शुद्धता कुठे व केव्हा हॉलमार्क केले होते यासह सर्व तपशील दिसतात. हे तपशील दिलेल्या तपशीलांशी जुळल्यास चिंता सोडून खरेदी करू शकता.

**बिलामध्ये HUID क्रमांक असावा :** दागिन्यांवरील HUID क्रमांक बिलावर आहे याची खात्री करा. तफावत आढळल्यास BIS केअर ॲपद्वारे तक्रार दाखल करू शकता.

## आज 1 किलो सोने खरेदी केल्यास २०५० मध्ये किती किंमत मिळेल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोन्याचे दर दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे आज १ किलो सोने खरेदी केल्यास २०५० पर्यंत त्याची किंमत किती होईल, याचा अंदाज घेणे रोचक आहे. सोने नेहमीच गुंतवणुकीसाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह पर्याय मानले जाते. आर्थिक अनिश्चिततेतही सोने स्थिरता प्रदान करते. चला, सध्याच्या दर आणि ऐतिहासिक ट्रेंडच्या आधारे २०५० मध्ये सोन्याची किंमत आणि गुंतवणुकीचे फायदे–तोटे जाणून घेऊया. सध्याची सोन्याची किंमत ऑक्टोबर २०२५ मध्ये भारतात २४ कॅरेट सोन्याची किंमत सुमारे ११,९४२ रुपये प्रति ग्रॅम आहे. म्हणजेच १ किलो (१००० ग्रॅम) सोन्याची किंमत अंदाजे १ कोटी १९ लाख ४२ हजार रुपये आहे. ही किंमत शहर आणि बाजारानुसार थोडी कमी–जास्त असू शकते.

**सोन्याची २०५० पर्यंत किंमत**

सोन्याच्या किमतीत गेल्या काही वर्षांत सरासरी ८ टक्के वार्षिक वाढ नोंदविली गेली आहे. हा ट्रेंड कायम राहिल्यास २०५० पर्यंत (२५ वर्षांनंतर) १ किलो सोन्याची किंमत सुमारे ३ कोटी २० लाख रुपयांपर्यंत पोहोचू शकते. जर वार्षिक वाढीचा दर १० टक्के असेल, तर ही किंमत ४ कोटी ५० लाख ते ५ कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकते. हे अंदाज ऐतिहासिक ट्रेंड आणि चक्रवाढ व्याजदरावर आधारित आहेत. तथापि, भविष्यातील आर्थिक परिस्थिती, जागतिक बाजारपेठ आणि इतर घटकांमुळे किमतीत चढ–उतार होऊ शकतात.

## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234



## श्री मंगळग्रह मंदिराला मालेगाव मित्र परिवाराची भेट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मालेगाव येथील मित्र परिवाराने मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी श्री मंगळग्रह मंदिरास भेट दिली. ३१ वर्षांनंतर मालेगावचा जुना मित्र परिवार एकत्र आला. त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर यांनी त्यांचे स्वागत केले.

' मालेगाव मित्र परिवार ' या नावाने असलेला हा परिवार सामाजिक कार्यातही अग्रेसर आहे. या समूहातील सर्व मित्र एकत्र आल्याने त्यांचा आनंद द्विगुणित झाला. त्यांच्या आयुष्यातील गोड आठवणींना उजाळा मिळाला. दीर्घ काळानंतर झालेल्या या भेटीत जुन्या आठवणी, गप्पा, हास्यविनोद आणि नव्या उमेदीनं भरलेले क्षण त्यांनी अनुभवले. इतक्या वर्षांनंतरही सर्वांच्या नात्यातील आपुलकी, स्नेह आणि मैत्रीचा तोच जुना गोडवा अनुभवता आल्याने उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

याप्रसंगी सर्वांनी एकमेकांना भेटवस्तू देत, पुन्हा अशा भेटींचे आयोजन करण्याचा संकल्प केला. मैत्रीचे हे बंधन अधिक घट्ट करून, पुढील काळात या नात्याला आणखी बहर आणण्याचा निर्धार सर्वांनी व्यक्त केला.




## संतांची पर्यावरणविषयक संवेदनशीलता अत्यंत महत्त्वाची : डॉ. विनोद ऊपर्वट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सध्याच्या युगात तंत्रज्ञानाचा झपाट्याने विस्तार होत आहे. मात्र, तरीही संतांचे विचार आणि त्यांची पर्यावरणविषयक संवेदनशीलता अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन धुळे येथील व्याख्याते डॉ. ऊपर्वट यांनी येथे केले.

खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयात राष्ट्रीय उच्चस्तर अभियानांतर्गत मराठी विभागाच्या अभिजात भाषा पंधरवाडानिमित्त मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी सकाळी झालेल्या व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव अध्यक्षस्थानी होते. डॉ. रमेश माने, डॉ. विलास गावित, प्रा. योगेश पाटील व्यासपीठावर उपस्थित होते.



डॉ. ऊपर्वट पुढे म्हणाले, की संत साहित्यातील निसर्गदृष्टी ही माणसाला निसर्गाशी एकरूप होण्याचा संदेश देते. संतांनी आपल्या अभंग, ओव्या आणि कीर्तनांद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवला. ज्याची आजच्या काळात विशेष गरज आहे. डॉ. एच. डी. जाधव म्हणाले, की विद्यार्थ्यांनी संत साहित्यातील मूल्यांचा अभ्यास करावा. त्यांची जीवनात अंमलबजावणी करावी. मराठी विभागाचे प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.गोपाल बडगुजर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सागर सैंदाणे यांनी आभार मानले. व्याख्यानप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांची मोठी उपस्थित होती.

## मोठेबाबा वारकरी सेवा संस्थानची अमळनेर येथे आज विभागीय बैठक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रीगुरू मोठे बाबा वारकरी सेवा संस्थानतर्फे (जळगाव) विभागीय बैठक गुरुवार, दि. १० रोजी पैलाड भागातील श्रीसंत तानाजी महाराज मठात होईल. बैठकीस जिल्ह्यातील वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. थेट गाव पातळीपासून ते जिल्हा पातळीपर्यंत वारकऱ्यांचे संघटन मजबूत व्हावे, वारकरी संप्रदायातील संप्रदायाच्या समस्या मार्गी लागाव्यात, प्रत्येक तालुक्यात वारकरी भवनाची निर्मिती व्हावी, वारकऱ्यांना आपत्कालीन सहायता मिळावी, निष्ठावान वारकऱ्यांचा गौरव व्हावा आदी विषयांवर बैठकीत चर्चा होईल. उपस्थितीचे आवाहन अध्यक्ष गौप्रेमी गजाननजी वरसाडेकर व हभप महंत प्रा. डॉ. सुशील महाराज विटनेरकर यांनी केले आहे.

## ' प्रताप 'च्या हेमंत गायकवाड, प्रेम साळुंखे, रोहन पाटील यांची कॅम्पसमध्ये निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या कॅम्पस भरतीत संगणकशास्त्र विभागातील हेमंत दीपक गायकवाड याची विप्रो कंपनीत स्कॉलर ट्रेनी म्हणून निवड झाली. त्याला कंपनीकडून बीआयटीएस पिलानी या प्रसिद्ध संस्थेतून एमटेक पदवी पूर्ण करण्याची संधी मिळणार आहे. तो सीसीएमसी विभागातील ग्रंथालयाचा वाचकही आहे. प्रेम भगवान साळुंखे याची अमेझॉनमध्ये डाटा ॲनालिस्ट म्हणून निवड झाली आहे. रोहन प्रमोद पाटील याची भारतीय नौदलात अर्थात इंडियन आर्मीत निवड झाली. या तिघांनी महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल खानदेश शिक्षण मंडळाचे व्यवस्थापन मंडळ, प्रभारी प्राचार्य, संगणकशास्त्र विभागप्रमुख आणि प्राध्यापक वर्ग यांनी अभिनंदन केले आहे.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
' चमकण्याची ' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# पाशांकुशा एकादशी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आश्विन शुक्ल एकादशी ही पाशांकुशा एकादशी म्हणून ओळखली जाते. ही एकादशी पापांचे निर्मूलन करणारी असून, पापी व्यक्तींसाठी रामबाण उपाय आहे. या व्रतामुळे स्वर्गप्राप्ती, मोक्षप्राप्ती, आरोग्य, सुंदर व सुशील पत्नी, सदाचारी पुत्र आणि अक्षय धन यांची प्राप्ती होते अशी मान्यता आहे .

**व्रतविधी**

१) या दिवशी भगवान विष्णू यांचे विधिवत पूजन करावे.
२) रात्री भगवंतांचे भजन, चिंतन आणि नामगुणसंकीर्तन करीत जागरण करावे.
३) दुसऱ्या दिवशी सकाळी पारणे करून व्रताची समाप्ती करावी.

**पाशांकुशा एकादशीचे माहात्म्य (ब्रह्मांडपुराणानुसार)**

युधिष्ठिर यांनी श्रीकृष्णांना विचारले, की हे मधुसूदना आश्विन शुक्ल पक्षातील एकादशीचे नाव आणि तिचा व्रतविधी कृपया सांगा.

श्रीकृष्ण म्हणाले, की हे धर्मराजा, आश्विन शुक्ल एकादशी ही पाशांकुशा एकादशी म्हणून प्रसिद्ध आहे. ही श्रेष्ठ एकादशी सर्व पापांचा नाश करते. या व्रताचे माहात्म्य पापांचे निर्मूलन करणारी आहे.

**व्रताचे फल**

● या दिवशी व्रत करणाऱ्याने स्वर्ग आणि मोक्ष देणाऱ्या पद्मनाभ भगवंताची पूजा करावी.
● अज्ञानामुळे केलेल्या पापांचा नाश भगवान विष्णू यांना पश्चात्तापपूर्वक नमस्कार केल्याने होतो. अशा व्यक्तीला नरकयातना भोगाव्या लागत नाहीत.
● पृथ्वीवरील सर्व तीर्थे आणि पुण्यस्थानांचे फल भगवान विष्णू यांच्या नामस्मरणाने मिळते.
● शारंग धनुष्य धारण करणाऱ्या आणि दुष्टांचे शासन करणाऱ्या भगवान विष्णू यांना शरण जाणाऱ्यांना यमलोक प्राप्त होत नाही.

**विशेष सूचना**

● जो वैष्णव शिवाची निंदा करतो किंवा जो शैव वैष्णवांची निंदा करतो, त्याला अनंत यातना भोगाव्या लागतात.
● हजारो अश्वमेध यज्ञ आणि शेकडो राजसूय यज्ञ केल्यानंतरही एकादशीच्या उपवासाच्या सोळाव्या हिश्शाइतकीही पुण्यता त्यात नसते.
● पद्मनाभ विष्णू यांचा एकादशीचा दिवस पापनाशक आहे. त्रैलोक्यात एकादशीच्या व्रतासारखे दुसरे पापनाशक व्रत नाही.
● जोपर्यंत मनुष्य भक्तीभावाने एकादशीचे उपवास करीत नाही तोपर्यंत त्याच्या देहात पापे राहतात.

एकादशीचे उपवास केल्यास यमाचे दर्शन होत नाही आणि मनुष्य विष्णुलोकाला जातो.

**व्रताचे फायदे**

● ही एकादशी स्वर्ग आणि मोक्ष प्रदान करते.
● शरीराला आरोग्य, उत्तम पत्नी, धनधान्याची समृद्धी मिळते.
● गंगा, गया, काशी, पुष्कर आणि कुरुक्षेत्र यांच्यापेक्षा हे व्रत अधिक पुण्यकारक आहे.



**श्रीकृष्ण यांचे वचन**

हे धर्मराजा, अधर्म करणारे दुर्गतीला जातात आणि धर्म करणारे स्वर्गारूढ होतात. तू विचारलेल्या पाशांकुशा एकादशीचे माहात्म्य मी तुला सांगितले आहे.

**दानाचे महत्त्व**

● या दिवशी सोने, तीळ, भूमी, गाय, पाणी, जोडा, वस्त्र, छत्री यांसारखी दाने द्यावीत. असे दान देणाऱ्याला यमाचे दर्शन होत नाही.
● पुण्यकर्माशिवाय आयुष्य घालवणारा मनुष्य जीवंत असला, तरी त्याचे जीवन लोहाराच्या भात्याप्रमाणे व्यर्थ आहे.
● दरिद्री व्यक्तीनेही शक्तीनुसार स्नान, दान आणि पुण्यकर्मे करून आयुष्य सार्थकी लावावे.
● तलाव, उद्याने, देवालये बांधणारे आणि अन्नछत्र चालवणारे धैर्यवान लोक यमयातना भोगत नाहीत.
● अशी पुण्यकर्मे करणारे लोक दीर्घायुषी, ऐश्वर्यसंपन्न, कुलीन आणि निरोगी होतात.

या दिवशी उपवास आणि जागरण केल्यास वैष्णवपद अनायास प्राप्त होते.
● या व्रताने आईच्या कुलातील १०, वडिलांच्या कुलातील १० आणि पत्नीच्या कुलातील १०, अशा एकूण ३० पुरुषांचा उद्धार होतो.
● हे सर्व पुरुष दिव्यरूप धारण करतात. पीतांबर परिधान करतात. गळ्यात माळ घालतात आणि गरुडावर बसून वैकुंठाला जातात.
● बालपणी, तरुणपणी किंवा वृद्धपणी या एकादशीचे उपवास करणारा, अनेकार्थी भाग्यवान ठरतो, अशी धर्मग्रंथाची मान्यता आहे.

■■■

# आता वेध लागले ते दीपावलीचे...!



शुक्रवार,
१७ ऑक्टोबर २०२५
: रमा एकादशी
– वसुबारस

शनिवार,
१८ ऑक्टोबर २०२५ :
गुरुद्वादशी–धनत्रयोदशी
(यमदीपदान)






सोमवार,
२० ऑक्टोबर २०२५ :
नरक चतुर्दशी–
अभ्यंगस्नान

मंगळवार,
२१ ऑक्टोबर २०२५ :
लक्ष्मी, कुबेर पूजन–
दर्श अमावास्या






बुधवार,
२२ ऑक्टोबर २०२५ :
बलिप्रतिपदा– दिवाळी
पाडवा : साडेतीन
मुहूर्तांपैकी एक मुहूर्त

गुरुवार,
२३ ऑक्टोबर २०२५
: यमद्वितीया
(भाऊबीज)





रविवार,
२ नोव्हेंबर २०२५ रविवार:
कार्तिकी एकादशी–
पंढरपूर यात्रा–
तुळशी विवाह प्रारंभ
चातुर्मास समाप्ती

# प्रेम, निष्ठा अन् परंपरेचा आधुनिक उत्सव : करवा चौथ

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

करवा चौथ दरवर्षी कार्तिक महिन्यातील कृष्ण पक्षातील चतुर्थीला साजरा केला जातो. जो इंग्रजी कॅलेंडरनुसार ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात येतो. यंदा करवा चौथ शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त....


भारतीय संस्कृतीत सण हे केवळ उत्सव नसतात, तर त्यामागे अनेक दैविक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक मूल्ये गुंफलेली असतात. अशाच खास सणांपैकी एक म्हणजे ' करवा चौथ '. विवाहित महिलांसाठी हा अत्यंत महत्त्वाचा आणि श्रद्धेचा दिवस असतो.

***करवा चौथ म्हणजे काय?***

करवा चौथ हा सण विशेषतः उत्तर भारतात, पंजाब, हरियाणा, राजस्थान, दिल्ली आदी भागांमध्ये मोठ्या श्रद्धेने साजरा केला जातो. परंतु आता देशभर तसेच परदेशातही भारतीय महिला तो साजरा करतात. या दिवशी विवाहित महिला पतीच्या दीर्घायुष्याच्या, समृद्धीच्या आणि आरोग्याच्या कामनेसाठी उपवास करतात. तसेच हे व्रत अखंड सौभाग्यासाठी आणि पती–पत्नीच्या प्रेमाचे प्रतीक मानले जाते.

***परंपरेचा आधार***

करवा चौथचा उल्लेख अनेक लोककथांमध्ये आढळतो. विशेषतः सती सावित्रीच्या निष्ठेच्या गोष्टीतून प्रेरित होऊन हा उपवास प्रचलित झाला, असे मानले जाते. याशिवाय हा सण राणी वीरवतीच्या कथेशीही संबंधित आहे. या लोककथा पती–पत्नीमधील प्रेम, समर्पण आणि विश्वासाचे प्रतीक म्हणून मांडल्या जातात.



***उपवासाची पद्धत***

या दिवशी सूर्योदयापूर्वी महिलांनी ' सर्गी ' नावाचे जेवण घेण्याची प्रथा आहे. जे त्यांच्या सासूबाईंनी दिलेले असते. त्यानंतर संपूर्ण दिवसभर त्या अन्न आणि जल वर्ज्य करून उपवास करतात. सायंकाळी चंद्र दर्शनानंतर पतीच्या हातून पाणी घेऊन त्या आपला उपवास सोडतात. हे दृश्य अनेक घरांमध्ये एक भावनिक आणि सुंदर क्षण असतो.

***आधुनिक काळात पुरुषांचाही सहभाग***

पूर्वी केवळ महिलांनीच उपवास करण्याची परंपरा होती. परंतु आजच्या काळात अनेक पुरुषही आपल्या पत्नी–प्रती प्रेम आणि समानतेची भावना व्यक्त करण्यासाठी करवा चौथचा उपवास करतात. सोशल मीडियावर #He-FastsToo किंवा #EqualLove अशा हॅशटॅग्स वापरून पती–पत्नी दोघेही उपवास करतानाचे फोटो व अनुभव शेअर करतात. हे परिवर्तन भारतीय सणांमधील लवचिकता आणि काळानुसार बदल स्वीकारण्याची तयारी दर्शविते.

***फॅशन व सजावटीचे ट्रेंड्स***

करवा चौथ हे साजरे करण्याचे धार्मिक कारण असले, तरी सौंदर्यसजावटीला त्यात विशेष महत्त्व असते. पारंपरिक लाल साड्या, लेहेंगा–चोली, कुंदन किंवा पोल्की दागिने, मेंदीचे नवीन डिझाईन्स यांचा यामध्ये ट्रेंड असतो. पारंपरिकतेसोबतच आजच्या तरुणी इंडो–वेस्टर्न डिझाइन्स, मिनिमल मेकअप आणि सस्टेनेबल फॅशनलाही पसंती देत आहेत. सौंदर्य सलून, मेकअप आर्टिस्ट आणि मेंदी कलाकारांसाठी करवा चौथ हे एक ' पीक सीझन ' मानले जाते. अनेक महिला आपल्या मैत्रिणींसोबत एकत्र येऊन ' करवा चौथ पार्टी ' किंवा ' मेंदी नाईट ' साजऱ्या करतात. ज्यामध्ये फॅशन शो, सेल्फी स्टेशन्स आणि थीम ड्रेस कोड्सही दिसतात.

***तारुण्यात करवा चौथचे स्थान***

पूर्वी केवळ विवाहित महिलांनी साजरा करायचा असलेला हा सण आता बदलत चाललेला दिसतो. आजची तरुण पिढी अगदी नवीन विवाह झालेल्या किंवा रिलेशनशिपमध्ये असलेल्या जोड्याही करवा चौथला महत्त्व देतात. काही तरुण तर ' प्रेम दिन 'प्रमाणे करवा चौथ साजरा करतात. ज्यात उपवास असेलच असे नाही. माक्ष एकमेकांसाठी खास वेळ काढण्याचा हेतू असतो. ओटीटी सीरिज, सिनेमे आणि सोशल मीडियावरील प्रभावामुळेही करवा चौथचा ग्लॅमर वाढला आहे. यातून एक गोष्ट स्पष्ट होते, की हा सण फक्त परंपरेपुरता मर्यादित न राहता भावनिक जोडणीचा सशक्त माध्यम बनतो आहे.

***नात्यांचा उत्सव, परंपरा आणि प्रगती यांचा संगम***

करवा चौथ केवळ एक धार्मिक परंपरा नव्हे, तर तो महिलांच्या मानसिक, शारीरिक आणि भावनिक सामर्थ्याचाही अनुभव आहे. काळ बदलतोय, पिढ्या बदलत आहेत. मात्र प्रेम, विश्वास आणि समर्पण यांची मूळ भावना अजूनही जपली जाते आहे.

# टिळा व गंध लावताना म्हणायचे मंत्र





ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हिंदू परंपरेत टिळा आणि गंध लावणे हे पवित्र आणि शुभ कार्य मानले जाते. वेगवेगळ्या व्यक्तींना, देवतांना आणि प्रसंगांना अनुसरून विशिष्ट मंत्रांचा उच्चार केला जातो. खालील लेखात टिळा आणि गंध लावताना म्हणायच्या मंत्रांचे संक्षिप्त आणि सुसंगत स्वरूपात वर्णन केले आहे.

**कपाळावर गंध का लावावा?**

अंघोळीनंतर कपाळ मोकळे ठेवू नये, असे आपले पूर्वज सांगायचे. यामागे धार्मिक आणि शास्त्रीय कारणे आहेत. गंध लावणे ही केवळ परंपरा नाही. देहातील ईश्वरी भाव जागृत ठेवण्याचा आणि स्वतःच्या सांस्कृतिक अस्तित्वाची जाणीव करून देणारा हा पवित्र विधी आहे. अलीकडेच बुद्धिबळपटू आर. प्रज्ञानंधाला परदेशात विचारले, की कपाळावर विभूती का लावतोस? त्याने उत्तर दिले, की माझी आई सांगते म्हणून. हे उत्तर आपल्या संस्कारांचे प्रतिबिंब आहे. जे लहानपणापासून आपल्यावर बिंबविले जातात.

**गंधाचे आध्यात्मिक महत्त्व**

हिंदू धर्मात ' देह देवाचे मंदिर ' मानला जातो. जसे मंदिरात ईश्वर व्यापतो तसेच देहातील प्रत्येक स्फुरण ईश्वराशी जोडते. हृदय, मेंदू, यकृत, मूत्रपिंड यांसारखे अवयव देहमंदिराचे आधारस्तंभ असतात. गंध लावणे म्हणजे या देहमंदिरातील ईश्वराची छोटीशी पूजा. ज्यांना पूजेसाठी वेळ नसतो त्यांनी अंघोळीनंतर कपाळावर गंध लावून अंतरात्म्याची पूजा करावी. गंध लावताना मध्यमा (मधले बोट) वापरले जात. ज्याचा थेट हृदयाशी संबंध आहे. या अंगुलीतून प्रवाहित होणारी ऊर्जा हृदयाला स्पर्श करते. कारण कपाळावरील गंध सतत ' देव माझ्यावर नजर ठेवतो ' याची जाणीव करून देतो. ही जाणीव पापकर्मापासून परावृत्त करते आणि सातत्याने सत्कार्याची प्रेरणा देते.

**शास्त्रीय कारणे**

गंध केवळ धार्मिक खूण नाही. यामागे शास्त्रीय आधार आहे. गंधात चंदन, हळद, अष्टगंध, गुलाल, कृष्णचंदन यांसारखे औषधी गुणधर्म असतात. कपाळावरील दोन भुवयांमधील आज्ञाचक्र जागृत ठेवण्यास गंध मदत करते. चंदनाचा थंड सुगंध मन शांत ठेवतो. हळद आणि अष्टगंध त्वचेला आणि मेंदूला सात्त्विक ऊर्जा देतात. गंधामुळे मस्तक शांत राहते आणि सकारात्मक विचारांना चालना मिळते.

**सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व**

गंध लावणारी व्यक्ती समाजात संस्कृतीरक्षक म्हणून पाहिली जाते. तिलकधारी व्यक्तीच्या चेहऱ्यावर भक्तिभाव, निर्मळता आणि सात्त्विकता दिसते. सुवासिनीने हळद–कुंकवाचा टिळा लावणे तिच्या तेजाला वृद्धिंगत करते. कीर्तनकार, प्रवचनकार, पुरोहित यांचे चंदन किंवा अष्टगंधाचे तिलक त्यांच्या सात्त्विक भावाला अधोरेखित करते. पूर्वी विजयानंतर ' विजय तिलक ' लावला जायचा. आजही बहीण भावाला, पत्नी पतीला, आई मुलांना गंध लावून दीर्घायुष्य आणि यशाची प्रार्थना करते. नवीन वस्तू किंवा वास्तूच्या पूजनातही गंध लावला जातो. ज्यामुळे त्या वस्तू पवित्र होतात.

गंध लावणे म्हणजे स्वतःच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक अस्तित्वाची जाणीव ठेवणे. हा केवळ धार्मिक विधी नाही, तर मन, शरीर आणि आत्म्याला सात्त्विक ऊर्जा देणारा शास्त्रशुद्ध उपाय आहे.

**१) देवाला गंध/टिळा लावताना :** देवताना गंध किंवा टिळा लावताना सौभाग्य, यश आणि दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली जाते.

**मंत्र : केशवानंत गोविंद बाराह सर्वोच्च।
पुण्यं यशस्यमायुष्यं तिलकं मे प्रसीदतु ॥
कांति लक्ष्मीं धृतिं सौख्यं सौभाग्यमतुलं बलम्।
ददातु चंदनं नित्यं सततं धारयाम्यहम् ॥**

अर्थ : हा मंत्र श्रीकृष्ण, गोविंद आणि सर्वोच्च देवतांचे स्मरण करतो. चंदन लावल्याने सौंदर्य, लक्ष्मी, धैर्य, सुख, सौभाग्य आणि बल प्राप्त होऊन जीवनपुण्य, यश आणि दीर्घायुष्याने समृद्ध व्हावे, अशी प्रार्थना आहे.

**२) स्वतःला टिळा लावताना :** स्वतःला टिळा लावताना पवित्रता आणि विपत्ती निवारणासाठी मंत्र म्हणावा.

**मंत्र : ॐ चंदनस्य महत्पुण्यं पवित्रं पापनाशनम् ।
आपदां हरते नित्यं, लक्ष्मीस्तिष्ठति सर्वदा ॥**

**अर्थ :** चंदन पवित्र आणि पापनाशक आहे. हा मंत्र आपदांपासून रक्षण आणि लक्ष्मीच्या कृपेची प्राप्ती करून देतो.

**३) ब्राह्मणांना टिळा लावताना :** ब्राह्मणांना टिळा लावणे हे आदर आणि शुभेच्छांचे प्रतीक आहे.

**मंत्र : ॐ स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः। स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः। स्वस्ति नास्ताक्ष्यों अरिष्टनेमिः। स्वस्ति नो बृहस्पतिरधातु ॥**
नमो ब्रह्मण्य देवाय गोब्राह्मण हिताय च।
जगत् हिताय कृष्णाय गोविंदाय नमो नमः ॥

**अर्थ :** हा मंत्र इंद्र, पुषा, ताक्ष्र्य आणि बृहस्पती यांना नमस्कार करतो आणि ब्राह्मण व गोवंशाच्या कल्याणासाठी श्रीकृष्णाला प्रार्थना करतो. यामुळे सर्वांना कल्याण आणि शांती लाभते.

**४) कुमारिकेला कुंकू लावताना :** कुमारी मुलींना कुंकू लावताना मंगलकामना आणि सौभाग्याची प्रार्थना केली जाते.

**मंत्र : ॐ अंबे अंबिके अंबालिके नामा नयति कश्चन। सस्सत्यश्वकः सुभद्रिकां काम्पिल वासिनिम् ॥**

**अर्थः** हा मंत्र देवी अंबिका आणि सुभद्रिकेचे स्मरण करतो. यामुळे कुमारी मुलींना सौभाग्य, शांती आणि कल्याण प्राप्त होते.

**५) देवीला हळद–कुंकू लावताना :** देवीला हळद–कुंकू अर्पण करताना सर्व मंगल आणि सुखाची प्रार्थना केली जाते.

**मंत्र : ॐ सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके।
शरण्ये त्रयम्बके गौरी नारायणी नमोस्तुते ॥
ॐ देहि सौभाग्यं आरोग्यं देहि मे परमं सुखम्।
रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषोजहि ॥
ॐ जयंती मंगला काली भद्रकाली कपालिनी।
दुर्गा क्षमा शिवा धात्री स्वाहा स्वधा नमोऽस्तुते ॥**

**अर्थ :** हा मंत्र देवी दुर्गा, काली आणि नारायणी यांना नमस्कार करतो. यामुळे सौभाग्य, आरोग्य, सुख, रूप, यश आणि शत्रूंचा नाश होतो.

**६) मुलांना गंध लावताना :** मुलांना गंध लावताना त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली जाते.

**मंत्र : ॐ यावत् गंगा कुरूक्षेत्रे यावत् तिष्ठति मेदनी।
यावत् रामकथा लोके तावत् जीवतु आयुः ॥**

**अर्थ :** हा मंत्र गंगा, कुरुक्षेत्र आणि रामकथेच्या शाश्वततेसह मुलांच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करतो.

**७) पुरुष यजमानाला गंध/टिळा लावताना :**
पुरुष यजमानाला टिळा लावताना कल्याण आणि समृद्धीची कामना केली जाते.

**मंत्र : ॐ भद्रमस्तु शिवं चास्तु महालक्ष्मिः प्रसीदतु।
रक्षन्तु त्वां सदा देवाः सम्पदाः सन्तु सर्वदा ॥
सपत्ना दुर्गः पापा दुष्ट सत्वाद्युपद्रवाः।
तमाल पत्र मालोक्यः निष्प्रभावा भवन्तु ते ॥**

**अर्थ :** हा मंत्र यजमानाच्या कल्याणासाठी महालक्ष्मी आणि देवतांना प्रार्थना करतो. शत्रू, पाप आणि विघ्ने नष्ट होऊन समृद्धी लाभावी, अशी कामना आहे.

**८) स्त्रियांना कुंकू लावताना :**
सौभाग्यवती स्त्रियांना कुंकू लावताना सुख–समृद्धीची प्रार्थना केली जाते.

**मंत्र : श्रीश्चते लक्ष्मीश्च पया व्हो रात्रे पाश्वे नक्षत्राणि रूपमश्विनौ व्यात्तम् । इष्णिनषां मम ईशां सर्व लोकमयीषां ॥**

**अर्थ :** हा मंत्र श्री आणि लक्ष्मी यांना स्मरतो आणि स्त्रियांना सौभाग्य, सुख आणि समृद्धी प्राप्त होण्यासाठी प्रार्थना करतो.

**९) पाहुण्यांना टिळा लावताना :** पाहुण्यांना टिळा लावणे हे आदर आणि शुभेच्छांचे प्रतीक आहे.

**मंत्र : ॐ भद्रमस्तु शिवं चास्तु महालक्ष्मिः प्रसीदतु।
रक्षन्तु त्वां सदा देवाः सम्पदाः सन्तु सर्वदा ॥**

**अर्थः** हा मंत्र पाहुण्यांच्या कल्याणासाठी आणि समृद्धीसाठी प्रार्थना करतो. ज्यामुळे त्यांना देवांचे रक्षण आणि समृद्धी लाभते.

**१०) पितरांच्या फोटोला गंध लावताना :** पितरांना गंध अर्पण करताना त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी प्रार्थना केली जाते.

**मंत्र : ॐ पितृगणाय विद्महे जगत् धारिणी धीमहि तन्नो पितृो प्रचोदयात।**

**अर्थ :** हा मंत्र पितरांचे स्मरण करतो आणि त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी प्रार्थना करतो.